# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे ४

सर्व्हे क्र.८३२ अ, फायनल प्लॉट क्र.१७८/१७९, बी.एम.सी.सी.रोड,
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४

दूरध्वनी क्र.०२०-२५७०५०००

फॅक्स क्र. ०२०-२५६६५०४६


क्र.रा.मं./पापुअ/ /९५३५
पुणे ४११ ००४.
दिनांक: २५ मार्च, २०२१.

प्रति,

१)मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
२)मा.विभागीय प्रसिध्दी उपसंचालक, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोंकण,
३)मा.संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई - ४०० ०३०,
४)मा.संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई २०,
५)मा.संचालक, आकाशवाणी केंद्र, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबाई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोंकण,
६)सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, सर्व जिल्हे,
७)मा.संपादक, सर्व वृत्तपत्र/ वृत्तवाहिन्या.

विषय:- इ.१२वी, सन २०२०-२१ साठी अभ्यासक्रमाचा मूल्यमापन आराखडा व तद्नुषंगिक बाबींसंदर्भात उच्च माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक (इ.१२वी) च्या काही विषयांच्या मूल्यमापन व तद्नुषंगिक बाबीं संदर्भात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या परीक्षेकरिता विषय शिक्षकांसाठी ऑनलाईन प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे. या प्रशिक्षणासाठी उच्च माध्यमिक / क.महाविद्यालयातील सर्व संबंधित विषय शिक्षकांनी ऑनलाईन नाव नोंदणी करावयाची आहे. या बाबतच्या प्रकटनाची प्रत सोबत जोडलेली आहे.

तरी सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्र/दृकश्राव्य माध्यमाच्या सर्व आवृत्त्यांमधून विनामूल्य प्रसिद्धी देण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ,पुणे ४.

क्र.कोविमं/उ.मा./गोप./२०२१/ 7585
दिनांक :- २६.०३.२०२१

इ.१२ वी सन २०२०-२१ साठी अभ्यासक्रमाचा मूल्यमापन आराखडा व तद्अनुषंगिक बाबीसंदर्भात उच्च माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबतचे प्रकटनाचे अवलोकन होवून पुढील योग्य ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

प्रति,प्राचार्य,सर्व कनिष्ठ महाविद्यालये/सातारा/सांगली /कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे

सर्व्हे क्र.८३२ अ, फायनल प्लॉट क्र.१७८/१७९, बी.एम.सी.सी.रोड,
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४

## -: निवेदन :-

**इ.१२वी, सन २०२०-२१ साठी अभ्यासक्रमाचा मूल्यमापन आराखडा व तदनुषंगिक बाबींसंदर्भात उच्च माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांतर्गत येणा-या क.महाविद्यालयातील उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी (इ.११वी व १२वी) • आरोग्य आणि शारीरिक शिक्षण(विषय सांकेतांक-३०), • चित्रकला(विषय सांकेतांक-५७), • संकल्पचित्र व रंगकाम(विषय सांकेतांक-५८), • चित्रात्मक संकल्प(विषय सांकेतांक-५९), • कलेचा इतिहास व रसग्रहण(विषय सांकेतांक-६०), • भारतीय संगीताचा इतिहास व विकास(विषय सांकेतांक-६५), • कंठ सुगम संगीत(विषय सांकेतांक-६६), • संठ शास्त्रीय संगीत(विषय सांकेतांक-६७), • वाद्यसंगीत(विषय सांकेतांक-६८), • तालवाद्य(विषय सांकेतांक-६९) या विषयांच्या विषयशिक्षकांसाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या परीक्षेकरिता ऑनलाईन प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे, हे प्रशिक्षण घेणे सर्व संबंधित शिक्षकांना अनिवार्य आहे. या प्रशिक्षणासाठी उच्च माध्यमिक / क.महाविद्यालयातील उपरोक्त विषयांच्या सर्व विषय शिक्षकांची ऑनलाईन नाव नोंदणी करुन घेण्यात येत आहे. उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी प्रशिक्षणास प्रविष्ठ होण्यासाठी मंडळाच्या evaluation.mh-hsc.ac.in या वेबसाईटवर दिलेल्या विहित प्रपत्रात/ फार्म मध्ये आपली माहिती दि.२५ ते २८ मार्च २०२१ या कालावधीत भरावयाची आहे. त्यानंतर लगेचच प्रशिक्षणाचे आयोजन केले जाईल.

तरी उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व संबंधित विषयशिक्षकांनी इ.१२वी, मूल्यमापन आराखडा व त्या तदनुषंगिक बाबींसंदर्भात ऑनलाईन प्रशिक्षणासाठी विहित मुदतीत नाव नोंदणी करावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्याकडून करण्यात येत आहे.

**दिनांक: २५/०३/२०२१**
**राज्यमंडळ, पुणे-०४.**

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्य मंडळ, पुणे.